
ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175


वर्ष ३६ | पुणे, बुधवार, ४ मार्च, १९७० | अंक ५

# दि बेळगांव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., बेळगांव



रविवार, दि. ८ मार्च, १९७० रोजीं साजरा होणाऱ्या सुवर्णमहोत्सवास आणि बँकेच्या

**अखंड अभ्युदयास आमच्या हार्दिक शुभेच्छा**



श्री. जी. व्ही. घोडगेरी, उपाध्यक्ष



श्री. एम. एस. होसमनी, अध्यक्ष

## रेल्वे दरातील वाढीचे समर्थन

सर्व वर्गांच्या उतारूंच्या भाड्यात वाढ, सीझन तिकिटांच्या दरात वाढ, पार्सल आणि गुड्सच्या दरात वाढ, ह्यामुळे उत्पन्नात पडणारी ३९ कोटी रुपयांची भर, ही १९७०-७१ च्या ८३२·५१ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकाची वैशिष्टये आहेत. अंदाजपत्रकात २२·३८ कोटी रुपयांचा वाढावा अपेक्षिलेला आहे. तिसऱ्या वर्गाच्या उतारूंकडून ८·२५ कोटी रु. अधिक मिळणार आहेत. त्यांच्या रेल्वेदरातील वाढ ३·७% आहे. वरच्या वर्गाच्या उतारूंच्या दरातील वाढ ७% असून त्यांचेपासून २ कोटी रु. जादा मिळतील. गुड्सची दरवाढ २५·५ कोटी रु. आणि पार्सलची दरवाढ २ कोटी रु. जादा मिळवून देईल.

सध्या गुड्सची वहातूक ६१ प्रकारांतून विभागली आहे; आता फक्त ३० प्रकार रहातील. अ आणि ब वर्गवारीचें एकत्रीकरण करण्यात आले आहे. ९७% मालवाहतूक वॅगनींच्या मोजमापाने होते; फक्त ३% माल वॅगन भरण्याइतका मोठा असतो. त्यांच्या वाहतुकीचा प्रत्येक टनी प्रत्येक किलोमीटरचा दर अंतर वाढत जाईल त्याप्रमाणे कमी कमी होत जातो. विशेषतः अ वर्गात तो फारच गतीने कमी होत जातो. त्याचा परिणाम म्हणजे पेंड, गहू, तांदूळ, ज्वार, बाजरी, लोखंडाचे खनिज, मीठ, सिमेंट, साखर, केरोसीन तेल, लोखंड व पोलाद, कापड, वनस्पती तेल, इत्यादींची वाहतूक रेल्वेजना प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चापेक्षाही कमी दराने होते. अ आणि ब वर्गांचे एकत्रीकरण करण्याचे वरील प्रकारे समर्थन करण्यात आले आहे.

उतारूंच्या भाड्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नापैकी ९८·५% उत्पन्न तिसऱ्या वर्गाच्या उतारूंपासून मिळते. तेव्हा, त्यांचे भाडे वाढविल्याखेरीज भाड्याच्या उत्पन्नात फारशी भर पडू शकणार नाही. सीझन तिकिटांना मासिक आणि त्रैमासिक दरात ७० ते ७५% सवलत मिळते त्यामुळे उपनगरी उतारूंच्या वहातुकीपासून रेल्वेजना ८ कोटी रु. नुकसान सोसावे लागते. ही वहातुक इतक्या गतीने वाढत आहे आणि गर्दी इतकी बेसुमार होत आहे की, सोईत वाढ करण्यासाठी भांडवली खर्च आता अपरिहार्य झाला आहे. सीझन तिकिटांचे भाडे वाढल्यामुळे जादा उत्पन्न ८० लक्ष रु. मिळेल.

रेल्वेजचा व्यवहार ओळीने तुटीत चालण्याचे हे चवथे वर्ष आहे. उत्पन्नात १६% वाढ होऊनही तूट कमी होत नाही. ह्याचा अर्थ, खर्चावर अधिक नियंत्रणाची आणि उपलब्ध साधनांचा अधिक कार्यक्षम वापराची आवश्यकता आहे.

---

## बँकिंग व्यवहारात हिंदीचा वापर

हिंदी विभागातील ग्रामीण क्षेत्रामधील दैनंदिन बँकिंग व्यवहारात, हिंदीला योग्य ते स्थान देण्याची राष्ट्रीयीकरण केलेल्या बँकांच्या कस्टोडिअन्सना सरकारने विनंती केली आहे.

---

## राजकीय पुढाऱ्यांना शंतनुरावांचे आवाहन

"कारखानदारांनी ग्रामीण विकास योजना हाती घेऊन संपत्ती निर्माण करण्यास आणि दारिद्र्य घालविण्यास हातभार लावला पाहिजे. वेरूळ लेण्याशेजारील एका खेडेगावात सुमारे १०० खेडुत अशा योजनेत सामील होत असून त्या योजनेला किर्लोस्कर ऑईल एन्जिन्स लि. आर्थिक साहाय्य करीत आहे. कंपनीने यंत्रसामुग्री आणि माल देऊन कामही शिकविले आहे. पुण्याजवळील एका खेड्यात एक शिक्षणसंस्था असाच कार्यक्रम आखीत आहे.

"व्यापारी वर्गाविरुद्ध जोराची तक्रार केली जाते. आमच्या टीकाकारात राजकारणी लोकांचा पुढाकार असतो. त्यातले काही आम्हाला समाजविघातक म्हणण्यासहि कमी करीत नाहीत. वास्तविक, आम्ही उत्तमात उत्तम माल कमीत कमी खर्चात उत्पादन करतो. त्याला व्यवस्थापन चातुर्य असणाराचे विधायक कार्य आवश्यक असते. त्यांच्या उत्पादन कार्यात दशलक्षावधि लोकांना रोजगार मिळतो. नफा मिळाला नाही, तर व्यापार-उद्योग अशक्य होऊन बसेल. नफ्याला विरोध करणारे राजकारणी लोक आर्थिक विकासाचा पायाच उखडून टाकीत आहेत. भारताला आधुनिक राष्ट्र बनविण्यास राजकीय पुढाऱ्यांच्या इतकेच आम्हीही उत्सुक आहो; ते काम आम्ही आमच्या कारखान्यातून आणि कचेऱ्यांतून दररोज, सतत करीत असतो. राजकीय पुढारी, राज्यकारभारी आणि व्यापारी वर्ग ह्यांनी ध्येय गाठण्यासाठी एकत्र येणे आवश्यक आहे. त्यामुळे एकमेकांच्या विरोधाला तोंड देण्यात शक्ती वाया जाते, ती वाचेल आणि अधिक कार्यक्षमतेमुळे ध्येयाप्रत लवकर पोचू शकू."

---


Statement about ownership and other particulars about newspaper 'ARTHA' to be published in the first issue every year after last day of February.

FORM IV
(See Rule 8)

1. Place of publication 823, Shivajinagar, Poona 4
2. Periodicity of its publication — Fortnightly
3. Printer's name — S. V. Kale
   Nationality — Indian
   Address — 823, Shivajinagar, Poona 4
4. Publisher's name — S. V. Kale
   Nationality — Indian
   Address — 823, Shivajinagar, Poona 4
5. Editor's name — S. V. Kale
   Nationality — Indian
   Address — 823, Shivajinagar, Poona 4
6. Names and addresses of individuals who own the newspaper and partners or shareholders holding more than one per cent of the total capital — S. V. Kale, 823, Shivajinagar, Poona 4

I, Shripad Vaman Kale, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date 4-3-1970 — S. V. Kale, Signature of Publisher.

☆ अर्थ ☆

बुधवार, ४ मार्च, १९७०



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

" अर्थ एव प्रधान:" इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

# घोषणेच्या मानाने संयमी अर्थसंकल्प

पंतप्रधान आणि अर्थमंत्री श्रीमती इंदिरा गांधी ह्यांनी मध्यवर्ती सरकारचे १९७०–७१ चे अंदाजपत्रक पार्लमेंटमध्ये शनिवार दि. २८ फेब्रुवारी रोजी मांडले. अंदाजपत्रकातील करवाढीशी सर्वांचाच संबंध येत असल्याकारणाने त्याबाबत लोकांची प्रतिक्रिया प्रतिकूल असणे अगदी स्वाभाविक आहे. श्रीमती गांधींनी मध्यवर्ती सरकारच्या नव्या खळबळजनक आर्थिक धोरणाचा गेले काही महिने देशभर प्रचार चालविला होता, तो लक्षात घेतला तर त्या मानाने प्रत्यक्ष अर्थसंकल्प फार संयमाचा वाटतो. त्याची दोन कारणे आहेत. (१) राष्ट्रीय उत्पादन वाढल्याखेरीज लोकांची क्रयशक्ती वाढत नाही आणि क्रयशक्ती वाढल्याखेरीज त्यांची कर देण्याची शक्ती वाढत नाही. त्यामुळे, कराचा बोजा तात्काळ वाढतो आणि तो उत्पन्नाशी अप्रमाण होऊ लागतो. (२) एकूण लोकसंख्येत श्रीमंतांचे प्रमाण लहान असल्याकारणाने, केवळ त्यांच्यावरील कर वाढविल्याने कराचे उत्पन्न फारसे वाढू शकत नाही. प्रायव्हेट सेक्टर हाच अर्थोत्पादक सेक्टर असल्याकारणाने, त्याच्या उत्पादनशक्तीला आणि प्रवृत्तीला अवास्तव ताण देता येत नाही. साहजिकच, करवाढीचा बोजा गरिबांवर पडणे अपरिहार्य होते.

भारतीय जनतेचे आर्थिक मागासलेपण लक्षात घेतले म्हणजे आधी करवाढ का आधी त्यांची आर्थिक सुधारणा, अशी समस्या उभी राहते. साहजिकच, आर्थिक परिस्थिती न सुधारता करवाढ करणे शक्य होत नाही आणि करवाढ केल्याखेरीज आर्थिक सुधारणेला पैसा मिळू शकत नाही. भारतात पहिली पंचवार्षिक योजना सुरू झाली, तेव्हाच ह्या समस्येवर बरीच चर्चा झाली होती आणि ज्यांना येथील मतदारांची मते मागावयाची नाहीत, अशा पाश्चात्य तज्ज्ञांनी स्पष्ट सांगितले की भारताची आर्थिक दुःस्थिती नष्ट करावयाची असेल तर जनतेला राहणीचे मान सत्वर वाढविण्याची आश्वासने देणे चुकीचे ठरेल; प्रारंभीच्या काळात जनतेच्या हाती येणारी संपत्ती सरकारने करांच्या आणि बचतीच्या रूपाने स्वतःकडे ओढून घेऊन ती पुनः उत्पादक रीतीने गुंतविली पाहिजे; योजनेच्या प्रारंभीच्या काळात राहणीचे मान थोडे कमी झाले तरी ते दूरदृष्टीने हिताचेच ठरेल. अर्थात, हा सल्ला आपल्याला पचण्याजोगा नव्हता. सरकारी धोरण दूरदृष्टीचे आहे, त्याचा कारभार कार्यक्षम आहे आणि त्याच्या हाती आपल्या मुलाबाळांचे भवितव्य निर्धोक आहे, असा विश्वास सरकारला जनतेत निर्माण करता आला पाहिजे, तरच सामान्य जनता स्वतःची आणखी उपासमार करून घेण्यास तयार होईल.

भारत सरकारचे धोरण ह्या परिस्थितीत किती खंबीर होऊ शकेल, ह्याला फार मर्यादा पडतात. ज्याला भरपूर आश्वासने दिली, ती पुरी पाडण्यासाठी त्याला प्रथम आणखी उपासमार करण्यास प्रवृत्त करण्याचे नैतिक सामर्थ्य सरकारने प्राप्त करून घ्यायला हवे. उत्पन्न-खर्चातील तूट भरून काढण्यासाठी प्रत्यक्ष करांचा अवलंब ज्या मानाने अधिक, त्या मानाने सरकारचे हे सामर्थ्य अधिक, असे म्हणायला हरकत नाही. ज्या मानाने अप्रत्यक्ष करांचा अवलंब मोठा आणि तूट भरून काढण्यासाठी चलनवाढीचा अवलंब जास्त त्या मानाने हे सामर्थ्य कमी पडते, असेच म्हणायला हवे. सामान्य जनतेची आर्थिक अभ्युदयाच्या बाबतीतील अवघड भूमिका लवकर स्पष्ट करून सांगावीच लागेल; ती जेवढी लवकर सांगता येईल तेवढे पुढील पिढ्यांच्या दृष्टीने इष्ट ठरेल.

श्रीमंतांची श्रीमंती कमी केल्याने तात्कालिक मानसिक समाधान गरिबांना मिळाले, तरी त्यांची गरिबी नष्ट करण्यास त्याचा पुरेसा उपयोग होणार नाही. अखेर, प्रत्येकाच्या श्रमातून आणि मिळकतीमधूनच अभ्युदय होऊ शकेल, ह्याची शिकवण समाजाला देणे अगत्याचे आहे. ही शिकवण देण्याचे सामर्थ्य पुढाऱ्यांत असणे, ही आजची प्राथमिक गरज आहे.

## अंदाजपत्रकाकडे दृष्टिक्षेप

आकडे कोटी रुपयांचे

| | अंदाजपत्रक १९६९–७० | दुरुस्त १९६९–७० | १९७०–७१ |
|---|---|---|---|
| महसुली जमा | २९९६·२९ | २९६५·४८ | ३२९१·६९ |
| खर्च | २९५९·९३ | २९७६·४२ | ३१५२·१८ |
| | +३६·३६ | −१०·९४ | +१३९·५१ |
| भांडवली जमा | १७२९·८८ | १९७५·५१ | १८२३·७१ |
| खर्च | २०१९·९२ | २२५४·६८ | २१८८·४६ |
| | −२९०·०४ | −२७९·१७ | −३६४·७५ |
| एकूण तूट | −२५३·६८ | −२९०·११ | −२२५·२४ |

## अकार्यक्षम उद्योगपतींना धक्का देणारे भाषण

फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ह्या संघटनेच्या आर्थिक आणि शास्त्रीय संशोधन शाखेतर्फे सुप्रसिद्ध आर्थिक तज्ज्ञ प्रो. पार्किन्सन ह्यांना भारतात व्याख्यानासाठी बोलविण्यात आले आहे. त्यांचे पहिले भाषण मुंबई येथे उद्योगपती व व्यापारी ह्यांच्या मेळाव्यापुढे झाले. भाषणात त्यांनी व्यक्त केलेले विचार अकार्यक्षम औद्योगिक पुढाऱ्यांना बोचण्यासारखे आहेत. ते म्हणाले की हल्लीच्या जगात ज्यांना आपले काम नीट कसे करावे ते माहीत नाही अशांची संख्या बरीच वाढली आहे. काही वरिष्ठ अधिकाऱ्यांना आपल्या नोकरीची शाश्वति वाढत नसते. त्यामुळे ते अस्वस्थ असतात. पण त्याची भरपाई आपल्या हाताखालच्या नोकरावर रागावून, ओरडून ते करीत असतात. कनिष्ठ नोकर नीट काम करीत नसतील तर तो त्यांचा दोष नसतो. त्यांना तसेच बनविले जाते. चांगल्या वरिष्ठाच्या हाताखाली ते चांगले काम करू शकतील. हल्ली उद्योगधंद्यांच्या क्षेत्रात पुढाकाराच्या वृत्तीची गरज राहिली नाही. कमिट्या बनवून गटांकडून निर्णय घेण्याची प्रथा वाढत चालली आहे. उद्योगधंद्यात तेजी असली म्हणजे असे निर्णय घेणे शक्य असते. पण परिस्थितीत बिघाड झाला की पुढाकार घेऊन काम करण्याची जरूर भासते. अलीकडे गणकयंत्रांचा वापर करण्याचे वेड पसरले आहे. स्वतःच्या मेंदूचा उपयोग करण्याऐवजी काम्प्युटरचा उपयोग करण्याची वृत्ति वाढत आहे. ही गणक यंत्रे धंद्याच्या प्रतिष्ठेची खूणच होऊन बसली आहेत. एखाद्या धंद्यात कॉम्प्युटर वापरला जात असला तर तो बहुधा सगळ्यांना दिसावा म्हणून कचेरीत प्रमुख ठिकाणी ठेवण्यात येतो.

---

## मध्यवर्ती सरकारच्या ७३ कारखान्यांना २८ कोटी रु. तोटा

मध्यवर्ती सरकारच्या मालकीच्या कारखान्यांतील एकूण गुंतवणूक १९६९ अखेर ३,५०० कोटी रु. होती. त्यांपैकी सहा कारखान्यांतच १,७१९ कोटी रु. गुंतलेले आहेत. ७३ मध्यवर्ती कारखान्यांना मिळून १९६८-६९ मध्ये २८ कोटी रु. तोटा आला. गेल्या वर्षी तो ३५ कोटी रु. होता. ४२ कारखान्यांनी मिळून ६६ कोटी रु. नफा दाखविला, तर ३१ कारखान्यांनी मिळून ९४ कोटी रु. तोटा दाखविला. त्यांपैकी हिंदुस्तान स्टील लि.ला ३९·४२ कोटी रु. आणि हेवी इंजिनिअरिंग कॉर्पोरेशनला १४·१२ कोटी रु. तोटा आला.

---

## परदेशी तंत्रज्ञांच्या भरतीमुळे हिंदी तंत्रज्ञांची आबाळ

काही दिवसांपूर्वी एका तज्ज्ञाने नियोजन मंडळाच्या एका सभासदाला पत्र पाठवून, भारतीय तंत्रज्ञांचा उपयोग करून न घेण्याच्या प्रवृत्तीवर टीका केली आहे. दहा वर्षांपूर्वी एका भारतीय पोलाद मंडळाने चीनमध्ये जाऊन तेथील वू-हान पोलाद कारखान्याच्या उभारणीचे काम पाहिले. तेव्हा त्याला तेथे फक्त दहा रशियन तंत्रज्ञ आढळले. ह्याउलट, भिलईच्या पोलाद कारखान्यात ९०० रशियन तंत्रज्ञ आहेत; तंत्रज्ञांची आयात अजून चालूच आहे.

---

## विविध माहिती

**नोटा छापण्याचा नवा छापखाना** – मध्यप्रदेशातील देवास ह्या ठिकाणी चलनी नोटा छापण्याचा दुसरा छापखाना काढण्याचे भारत सरकारने ठरविले आहे. नाशिक येथे असा पहिला कारखाना आहे. देवास येथे छापण्यात येणाऱ्या चलनी नोटांसाठी हुशंगाबाद येथे तयार करण्यात येणारा कागद वापरण्यात येणार आहे. हुशंगाबाद मध्यप्रदेशातच आहे.

**मेरिनो मेंढ्यांची आयात** – मुंबई येथील एका लोकरीच्या गिरणीच्या मालकाने ऑस्ट्रेलियातून मेरिनो जातीच्या जातिवंत मेंढ्या आयात केल्या आहेत. सिडने येथील लिलावात मालकातर्फे तीन मेंढ्यांवर १८,४८० रुपयांना विकत घेण्यात आल्या. उत्तम लोकरीसाठी प्रसिद्ध असणाऱ्या ह्या मेंढ्या परदेशांना विकण्यात आल्याचा ४० वर्षांतील हा पहिलाच सौदा आहे.

**टपालासाठी हेलिकॉप्टरचा उपयोग** – उत्तर भारतामधील हिमाचल प्रदेशातील लाहुल स्पिती खोऱ्यातील केलाँग हे गाव आता टपालाच्या टप्प्यात आले आहे. गाव आता वाईट हवेतही बाहेरील गावांशी दळणवळण ठेवू शकेल. हे साधण्यासाठी चंदीगढहून हेलिकॉप्टरच्या साह्याने टपाल नेण्या-आणण्याची सोय करण्यात आली आहे.

**घरे बांधण्यासाठी सोडत** – भारत सरकारचे घर बांधणी खाते घरांच्या बांधणीसाठी सोडत सुरू करण्याचा विचार करीत आहे. सोडतीत भाग घेणाऱ्या प्रत्येक १०० माणसांमागे एकाला १० हजार रुपयांचे घर मिळेल, अशा रीतीने सोडतीची आखणी करण्यात येईल. प्रत्येक तिकिट १०० रुपयांचे असेल आणि प्रत्येक साखळीत १०० तिकिटे असतील.

**परकीय तज्ज्ञांवरील खर्च** —भद्रावती येथील पोलादाच्या कारखान्याच्या विस्ताराचे काम करण्यासाठी २५ जर्मन तंत्रज्ज्ञ तेथे खपत आहेत. त्यांचे काम संपल्यावर सुमारे ६ महिन्यांच्या अवधीत ते परत जातील. जर्मनीमधून आयात केलेली यंत्रसामग्री योग्य प्रकाराने काम देईल अशी हमी त्यांच्याकडून मिळणार आहे. १९६३ पासून ह्या जर्मन तंत्रज्ज्ञांवर २ कोटी रुपये खर्च झाले आहेत.

**पाकिस्तानात मद्यपानाची वृद्धी** —कराची विद्यापीठाने केलेल्या पाहणीप्रमाणे कराचीत गेल्या दहा वर्षांत मद्यपानाची वृद्धी ८० टक्के झाली आहे. १९६० मध्ये कराचीत दारूची विक्री करणारी ३० दुकाने होती. आता त्यांची संख्या १०० पेक्षाही अधिक झाली आहे. दारूवरील अबकारी कराचे उत्पन्न ३ कोटी रुपयांवरून १९ कोटी रुपयांपर्यंत वाढले आहे. नवीन पिढीच्या तरुणीत मद्यपानाची आवड झपाट्याने वाढत आहे.

---

## Speech delivered by Shri S. L. Kirloskar, Chairman, Kirloskar Bros. Ltd. at the 49th Annual General Meeting of the Company on Saturday, the 31st January, 1970



Ladies & Gentlemen,

I am pleased to welcome you to this meeting of the members of the Company.

The last year was a momentous one. June 20th, 1969 was the Birth Centenary of the Founder, late Shri L. K. Kirloskar. This event was celebrated not only in our factories but throughout India. The Posts and Telegraphs Department issued a Commemorative stamp on this occasion as a token of its recognition of the pioneering work done by the Founder. A statue of the Founder was erected at Kirloskarvadi to mark this occasions and was unveiled by Union Home Minister, Hon'ble Shri Y. B. Chavan. On this occasion we in the organization rededicated ourselves to achieving success through his ideal of hard work.

The Directors' Report and the Audited Accounts for the year ending 31st July, 1969 have been in your hands for some time and I am sure all of you have gone through the same. I would like to deal with the features of the accounts before you.

The turnover last year was 28% higher than the previous year. For the first time the Company has crossed the Rs. 10 crore mark. However, this required employment of larger resources. The costs of manufacture are continuously going up due to rise in the costs of materials and wages and the Company is unable to realise higher prices to compensate for such increased costs. While the demand continued to be good, the customer had a wider choice requiring considerable marketing effort to be done before this higher turnover could be achieved. The profit therefore has to be considered against this background and I am sure you will find the same satisfactory under the circumstances.

Sales in the current year so far for the first five months are more than those for the same period last year. Production is also increasing and if the present tempo of demand continues I am sure the year should end up with a further improvement in the turnover. The new year has brought about considerable changes in the country creating an atmosphere of uncertainty. While I do not wish to dwell on these changes taking place I must say that sooner or later they are bound to have an impact on trade and industry. Recently there was a price rise in steel, non-ferrous metals and bearings. While costs and prices of industrial commodities are going up, I observe that prices of agricultural commodities are falling. This situation is bound to have an adverse effect on demand for some of our products which are required by the farmers.

Some shareholders have written to me requesting that the Company should issue a bonus share to mark the Birth Centenary of the Founder. While I understand the sentiment behind the suggestion I am afraid the Board has not been able to accept the same. It is our policy to issue bonus shares from time to time when we are satisfied that there is a reasonable chance of maintaining the dividend. Also you will find that the Company has issued bonus shares twice in the last two years and before we again consider this matter the Board would like to carefully assess the prospects for the next few years. The policies of the Government are undergoing changes. We are not yet clear as to the credit policies which the Banks will follow and, therefore, it is necessary at this present moment to conserve al the resources in order to carry out the new projects already in hand. I am sure, you will appreciate that the present is not the most opportune time for considering this matter. I need hardly stress here that this is a matter which is constantly under review and as in the past the Board will on its own decide when the proper time comes. The shareholders will however be pleased that the Board has recommended a higher dividend of 12% as against 9% last year on equity shares. A shareholder holding about 100 equity shares in 1966 prior to the issue of bonus shares in that year would have earned only Rs. 300 @ 12% dividend. But due to the issue of bonus of shares thereafter he will be earning Rs. 540 which is a little over 21% on the investment of that year.

The work on the Sealed Compressor project at Karad has already started and we hope to commence production by the end of 1970. Our Karad project is designed to meet a considerable part of the demand for Sealed Units required by the refrigeration and air-conditioning industries in the country as well as considerable amount of export. The demand for refrigerators and air-conditioners is likely to grow considerably and there is actually a vast potential for the growth of the Sealed Compressor industry. However, the market for this product is dependent on the Government policies and what appears to be a potentially large market may not be actually be so if the Government levies further excise duties on the end products like refrigerators and air-conditionders. If the present excise duties on this product are reduced then the growth of this industry will be much faster.

We have also decided jointly with Kirloskar Oil Engines Limited to promote a new Company for manufacture of tractors. It has been our desire to manufacture tractors but the project has not so far seen the light of the day. We have now been able to come to an arrangement with the German firm, Klockner-Humboldt-Deutz for a collaboration for the manufacture of tractors and this has been approved by the Central Government. This is a large project involving considerable capital outlay and we had to decide whether it should be carried out by this Company or whether a new Company should be promoted for the same. We have come to the conclusion that it is in the best interest of the shareholders of this Company that a new Company is promoted in which we will be holding 51% of the equity capital.

Before concluding, I would like to refer to the question of management. The Managing Agency System will terminate from 3rd April, 1970. So, from 3rd April, 1970, the long association of Kirloskar Sons & Co. with this Company will come to an end. Kirloskar Sons & Co. have been the Managing Agents ever since 1920 when the Company was incorporated. The Managing Agents have brougtht the Company from its small beginning in 1920 to its present stature. The record of the Managing Agents for the last 50 years is before you, I need hardly stress at length the achievements of the Company during their tenure. I would like to say here that the Managing Agents have done their duty by the shareholders, by the employees of the Company and by the society at large and done it well. On behalf of the Managing Agents I would like to thank the shareholders for their unstinted co-operation and support.

At the Extraordinary General Meeting of the shareholders on 5th December, 1969 various resolutions were passed amending the Articles of Association to provide for the appointment of Managing and Whole Time Directors. According to the mandate given by the shareholders, the Directors have taken further steps for the appointment of Managing Director and in due course a meeting of the shareholders will be convened to approve of the remuneration to the Managing Director.

With these remarks I move the Directors' Report and Accounts for adoption. If you have any questions I will answer them to the best of my ability.

Thank you.

*Note* : This does not purport to be the proceedings of the 49th Amual General Meeting of the Company.

---

## जपानी यांत्रिक नांगरांचा पुरवठा

जपानमधील शेतीची यांत्रिक अवजारे भारताला अधिक उपयुक्त असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. कारण तेथील शेती मुख्यतः छोट्या शेतकऱ्यांच्या मालकीची असून ती करण्यासाठी योग्य अशी अवजारे जपानमध्ये बनविण्यात येतात. जपानचा यांत्रिक नांगर हा अतिशय कार्यक्षम असून उंचसखल जमीन नांगरण्यासाठी त्याचा चांगला उपयोग होतो. अशा प्रकारचे, यांत्रिक नांगर लवकरच भारतात मिळू लागणार आहेत. केरळ ॲग्रो-इंडस्ट्रीज कॉर्पोरेशन ही संघटना जपानी नांगर आयात करणार आहे. ४५० यांत्रिक नांगरांचा पहिला हप्ता दोनतीन महिन्यांत भारतात येईल. सध्या ह्या नांगरांची फक्त जुळणीच भारतात करण्यात येणार आहे. मात्र जपानच्या सहकार्याने त्याचे उत्पादन सुरू करण्याची खटपट चालू आहे.

---

## जपानच्या मोटारधंद्याची स्पर्धा

एक वर्षापूर्वी अमेरिकेतील मोटारीच्या कारखान्यांनी ९० लाख मोटारी उत्पादन केल्या. जगांतील बाकीच्या उत्पादनापेक्षाही हे उत्पादन अधिक होते. पण अलीकडे परिस्थितीत फरक पडू लागला आहे. सध्या बाकीच्या जगातील मोटारींचे उत्पादन अमेरिकेपेक्षा अधिक होऊ लागले आहे. अमेरिकेच्या मोटार कारखानदारीला आता जपानकडून आव्हान मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. १९६० साली जपानमध्ये अवघ्या १.६ लाख मोटारी तयार करण्यात आल्या. आता मोटारींचे उत्पादन ६ लाखापर्यंत वाढले आहे. जपानने फ्रान्स व ब्रिटनला मोटारींच्या उत्पादनाबाबत मागे सारले आहे. पश्चिम जर्मनी आणि अमेरिका ह्या खालोखाल आता जपानचा अनुक्रम लागतो. जपान सध्या २० टक्के मोटारी निर्यात करतो.

---

# दि बेळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., बेळगाव

## सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने

## बँकेच्या कार्याचे सिंहावलोकन

**दि बेळगाव डिस्ट्रिक्ट सेंट्रल को. बँक लि., बेळगाव, ह्या बँकेचा सुवर्णमहोत्सव रविवार दि. ८ मार्च, १९७० रोजी बँकेच्या नव्या इमारतीच्या जागी साजरा होणार आहे. ह्या समारंभाचे उद्‌घाटन काँग्रेसचे अध्यक्ष डॉ. एस. निजलिंगप्पा हे करणार असून म्हैसूर राज्याचे मुख्य मंत्री श्री. वीरेंद्र पाटील हे अध्यक्षस्थान स्वीकारतील. बँकेच्या सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने बँकेचे गेस्ट हाऊस बांधण्यात येणार आहे, त्याची कोनशिला विकास, पंचायत राज्य आणि सहकार मंत्री श्री पी. एम्. नाडगौडा हे बसवतील. म्हैसूर राज्याचे सहकारी सोसायट्यांचे रजिस्ट्रार श्री. सी. ए. जमखंडीमठ, आय. ए. एस., हे सुवर्ण महोत्सव स्मरणिका प्रसिद्ध झाल्याचे जाहीर करतील.**

### संस्थेची सुरवात व तिचा विकास :

#### राष्ट्राच्या विकासाला हातभार लावण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी

सन १९१८ साली दिवंगत रावबहादूर आर. जी. नाईक, एम्. बी., ई., डिव्हिजनल ऑनररी ऑर्गनायझर, बेळगाव यांनी बेळगाव जिल्ह्यासाठी स्वतंत्र जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निर्मितीची योजना हाती घेतली. जिल्ह्यातील सहकारी योजनेत भाग घेणाऱ्या मंडळींशी विचारविनिमय करून बेळगाव जिल्हा सहकारी बँक नियमित बेळगाव, या संस्थेची योजना आखली व बारा संचालक मंडळींच्या सह्या घेऊन सहकारी संघाच्या रजिस्ट्रारकडे नोंदणीसाठी पाठवण्यात आली.

१७ डिसेंबर, १९१८ रोजी बँक रजिस्टर करण्यात आली व १० फेब्रुवारी, १९१९ रोजी तिच्या वैभवशाली कारकीर्दीस सुरवात झाली.

आद्य संस्थापकांपैकी आज बहुतेकजण जरी हयात नसले तरी आपल्यामागे त्यांनी सहकारी चळवळीविषयीची आपली तळमळ, कळकळ व उमेद यांचा जो वारसा ठेविला तो त्यांच्या पुढील वारसदार दिग्दर्शक मंडळाने पूर्ण जिद्दीने उचलला व त्यांची आंतरिक इच्छा पूर्णत्वाला नेली.

२६ वैयक्तिक सभासद, ९ संघ सभासद आणि केवळ रु. १३,४०३ कार्यान्वित भांडवल यावर बँकेच्या कामकाजाला सुरवात झाली. इतक्या तुटपुंज्या साधनावर झालेल्या बँकेने आज नेत्रदीपक सुयश प्राप्त केलेले आहे. आज मितीस ५६८ वैयक्तिक सभासद, ९७२ संघ सभासद व रु. ८,०१,०१,०४२ इतके (जून १९६९ च्या अखेर) खेळते भांडवल यांचा समावेश आहे.

#### बँकेचे ऑफिस व तिच्या शाखा

बँकेचे कामकाज पायोनिअर अर्बन सोसायटीच्या एका लहान, मासिक रु. ५ प्रमाणे घेतलेल्या भाडोत्री खोलीत सुरू झाले. त्यानंतर १९२६ साली याच बँकेचे कामकाज एका सुसज्ज अशा मासिक रु. २० भाडे असलेल्या रामदेव गल्लीतील खोलीत केले गेले आणि हीच स्थिती १९३३ पर्यंत होती. त्याच वर्षी बँकेने १०,००० रु. किमतीची एक इमारत खरेदी केली. या इमारतीच्या सुधारणेसाठी ९,००० रुपये खर्च झाले. बँकेच्या रौप्य महोत्सवाच्या वेळी बँकेच्या उत्तरेकडील बाजूस एक मजला वाढवण्यात येऊन, बँकेच्या मनोऱ्यावर ८,००० रु. खर्च करून एक मोठे घड्याळ बसविण्यात आले. तसेच, १९५२ मध्ये १७,५०० रु. खर्चून सोयीसाठी बँकेला लागून असलेली इमारत खरेदी केली व त्यावर २६,५०० रु. खर्च करून नवीन इमारत १९६३ मध्ये बांधण्यात आली.

वरील प्रयत्नानंतर वाढता व्यवहार व नोकरवर्ग यामुळे ही जागा अपुरी पडू लागली म्हणून चालकवर्गाने मोठ्या भव्य इमारतीसाठी जागा खरीदण्याचा विचार केला. सुदैवाने चालकवर्गाने बेळगाव येथील मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुरन्स कंपनीच्या मालकांबरोबर वाटाघाटी करून नॅशनल हायवे नं. ४ वरील त्यांची इमारत खरेदी केली. ही इमारत नवीन असून अशा बँकेला शोभा देणारी आहे. तसेच इमारतीच्या सभोवतालची जागा पुढे सुधारणेच्या दृष्टीने योग्य आहे. या इमारतीची किंमत ३,७६,००० रु. इतकी आहे. बँकेला उपयुक्त होण्याच्या दृष्टीने जरुरीचे सर्व कामकाज या इमारतीमध्ये सुरू करण्यात आले आहे. ज्या वेळी हा अहवाल वाचकांच्या हाती पडेल त्या वेळी बँकेचे मुख्य ऑफिस या इमारतीत सुरू झालेले असेल.

या मुख्य ऑफिसशिवाय बँकेच्या बैलहोंगल, चिक्कोडी व सौंदत्ती येथील शाखा बँकेच्या स्वतःच्या इमारतीत आहेत.

बँकेशी संलग्न असलेल्या संघांच्या कामकाजाच्या मदतीसाठी आणि तत्पर सेवेसाठी व त्याचबरोबर सेहुतांची बचत योजनेची मोहीम यासाठी बँकेने जवळ जवळ २६ शाखा उघडल्या आहेत.

#### दिग्दर्शकांचे मंडळ आणि कार्यकारी समिति

अद्ययावत दुरुस्ती केल्यावर पोट-नियम नं. २० मध्ये २१ दिग्दर्शकांचे मंडळ बनविण्यात आले त्याची रचना पुढीलप्रमाणे आहे व त्याची मुदत ३ वर्षांची आहे.

(अ) मार्केटिंग व सेल सोसायट्या, सहकारी स्टोअर्स व कन्झ्युमर्स सोसायट्या वगळून प्रत्येक तालुका किंवा महालमधून कमीत कमी एक व जिल्ह्यासाठी जास्तीत जास्त १६ अशी संलग्न झालेल्या सोसायट्यांनी आपल्यामधून प्रतिनिधी निवडून

द्यावेत. प्रत्येक तालुक्यांच्या प्रतिनिधींची संख्या त्या त्या तालुक्यातून संलग्न झालेल्या सोसायट्यांचा आकडा लक्षात घेऊन ठरविली जावी.

(ब) संलग्न झालेल्या मार्केटिंग, सेल सोसायट्या, सहकारी स्टोअर्स अथवा कन्झ्युमर्स सोसायट्यांनी आपल्यामधून एक प्रतिनिधी निवडून द्यावा.

(क) वैयक्तिक शेअर धारण करणाऱ्या सभासदांनी चार प्रतिनिधी निवडून द्यावेत.

(ड) राज्य सरकारकडून एक प्रतिनिधी नेमला जावा.

(इ) राज्य प्रमुख बँकेने एक प्रतिनिधी नेमावा.

निवडून येणाऱ्या वरील २१ दिग्दर्शकांची निवडणूक आळीपाळीने केली जाते. बोर्डाने एक तक्ता केला असून या तक्त्याप्रमाणे १/३ दिग्दर्शक दरवर्षी निवृत्त होतात पण पुनर्निवडणुकीस ते पात्र असतात. दिग्दर्शकांची मंडळावर होणारी निवडणूक गुप्त मतदान पद्धतीने व एम. सी., एस. आर., १९६० नियम १४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे घेतली जाते.

मंडळाच्या निवडणुकीनंतर मंडळ दरवर्षी आपल्यामधून अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड करते. अध्यक्ष किंवा त्यांच्या गैरहजेरीत उपाध्यक्ष बँकेच्या दैनंदिन कारभारात लक्ष घालतात. अध्यक्ष, उपाध्यक्ष अगर दिग्दर्शक यांच्यासाठी काही वेतन अगर मानधन दिले जात नाही. संबंधित पोटनियमामध्ये नमूद केल्याप्रमाणे दिग्दर्शक आपल्या अधिकाराचा वापर करतात. जरुरीप्रमाणे वारंवार अगर कमीत कमी तीन महिन्यांत एकदा मंडळाची बैठक भरते.

### बँकेचे सभासद : व्यक्ती व संघ

फक्त ९ संघ सभासद व २६ वैयक्तिक सभासद यावर बँकेची सुरवात झाली. कालांतराने ही संख्या वाढत गेली. पहिले वर्ष वगळल्यास पुढील सहा वर्षांत म्हणजे १९१९–२० ते १९२४–२५ मध्ये संघाचे सभासदत्व वैयक्तिक सभासदांच्या संख्येपलीकडे गेले. तदनंतर परिस्थिती उलट झाली. दरवर्षी वैयक्तिक सभासदांची संख्या वाढत गेली व १९६०–६१ मध्ये ती २,१८९ होती व संघांची संख्या पुढे ८५९ होती. १९६०–६१ वर्षापासून वैयक्तिक सभासदांची संख्या घटत चालली. संलग्न होणाऱ्या संघांची संख्या वाढू लागली. १९६८–६९ च्या अखेरीस वैयक्तिक सभासदांची संख्या ५६८ व संघांची संख्या ९७२ झाली.

### शेअर भांडवल

बँकेचे अधिकृत शेअर भांडवल रु. ८५,००,००० इतके असून ते पुढील प्रकारच्या शेअर्सनी बनलेले आहे.

रु. २०,००,००० राज्य सरकारला देण्यात आलेले प्रत्येकी रु. १००० चे 'अ' वर्गाचे २,००० शेअर्स.

रु. ६०,००,००० संघांना देण्यात आलेले प्रत्येकी रु. १०० चे 'ब' वर्गाचे ६०,००० शेअर्स.

रु. ५,००,००० वैयक्तिक सभासदांना देण्यात आलेले प्रत्येकी रु. १०० चे 'क' वर्गाचे ५,००० शेअर्स.

बँकेचे वसूल भांडवल रु. ७७,२९,२०० असून त्यात राज्य सरकारचे रु. १५,००,०००, संघांचे रु. ५९,४५,६५० व वैयक्तिक सभासदांचे रु. २,८३,५५० अशा रकमा आहेत. त्यांची अनुक्रमे १९.४, ७७.० व ३.६ अशी टक्केवारी आहे.

### ठेवी

८,२३३ रुपये सुरवातीला जमविलेल्या ठेवींवर ही सुरू झालेली बँक आहे. पण आज तिने रु. ४,८९,२४,६२३ इतके ३०–६–६९ च्या आढावा पत्रकात दाखविल्याप्रमाणे वेगवेगळ्या ठेवींच्या रूपाने जमविलेले आहेत. हे काही आजकालच्या दिवसांतले लहानसहान साध्य नव्हे. कारण या क्षेत्रात स्पर्धा करणाऱ्या जॉईंट स्टॉक बँका खूप आहेत. तथापि या क्षेत्रात बँकेने आपले नाव राखलेले आहे.

या बँकेचे मुख्य लक्ष व ध्येय म्हणजे खेड्यांतील लोकांना काटकसरीची संवय जडवून आपली बचत जिल्हाभर पसरलेल्या या बँकेच्या शाखांमध्ये गुंतविण्यास प्रवृत्त करणे व प्रोत्साहन देणे.

चालू ठेव, बचत ठेव, मुदत ठेव, अशा सर्व प्रकारच्या ठेवी बँक स्वीकारते. याशिवाय लहान उत्पन्न असणाऱ्या ठेवीदारांकरिता रिकरींग व काटकसरीच्या ठेवींची सोय केलेली आहे.

### प्रथम सेवा, नंतर फायदा

याखेरीज बँक स्थानिक संस्था, म्युनिसिपालिट्या आणि ग्राम पंचायत यांच्याकडून ठेवी स्वीकारते. तसेच आपल्या खातेदारांतर्फे पेन्शन बिल व इतर बिलांची रकम वसूल करण्याचे काम करते. बँकेच्या बैलहोंगल, बेळगाव बझार व सौंदत्ती येथील शाखेत सेफ डिपॉझिट व्हाल्टस व लॉकरची सोय असून योग्य भाड्याच्या दराने देते. आपल्याकडील मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवण्यासाठी बँकेचे खातेदार याचा उपयोग करतात. आपल्या खातेदारांसाठी बँक इतर काही बँकिंगच्या सोई देऊ शकते.

ठेवी गोळा करण्याच्या व आपल्या खातेदारांना बँकिंगची सेवा देण्याच्या उत्साहात व्यवस्थापक मंडळाने हाच व्यवसाय करणाऱ्या आपल्या शेजाऱ्यांशी अयोग्य अशी स्पर्धा केली नाही. ठेवींवर व्याज देण्याच्या दरात व खातेदारांना सेवा देत असताना त्यांना कमिशन आकारण्याच्या बाबतीत बँकेने स्वतःला योग्य मर्यादेत ठेवून घेतले आहे. या सर्व वर्षांत बँकेचे ध्येय "प्रथम सेवा, नंतर फायदा" असे आहे.

सुवर्ण महोत्सव साजरा करण्यासाठी, बँकेने पाच वर्षांच्या अवधीची व ८ टक्के व्याजाची एक आकर्षक ठेवीची योजना केली असून एक कोटी रुपये जमविण्याचे उद्दिष्ट आहे. रु. २५,९१,५०० जमविले आहेत.

### राखीव निधी व इतर निधी

पुढील तुलनात्मक आकड्यांवरून बँकेने निर्माण केलेल्या

विविध निधींची अवस्था व त्यायोगे बँकेचे अलीकडील आर्थिक सामर्थ्य दाखविणारा तक्ता.

१९६४–६५ ते १९६८–६९ पर्यंत बँकेचे निधी.

(आकडे हजारामध्ये)

| निधी | १९६४–६५ | १९६५–६६ | १९६६–६७ | १९६७–६८ | १९६८–६९ |
|---|---|---|---|---|---|
| १ कायद्यानुसार राखीव निधी | ८८४ | ९७१ | १०३७ | ११२७ | १२८६ |
| २ इमारत निधी | १६० | १६४ | १६७ | १७५ | १८६ |
| ३ शेतकी पत स्थिरीकरण निधी | २ | ३८ | ९४ | १७० | २८८ |
| ४ बुडीत व शंकास्पद कर्जासाठी निधी | २०० | २११ | २१७ | २३२ | २६३ |
| ५ खास बुडीत कर्जासाठी निधी | ८५ | ८७ | ८७ | ९७ | १०६ |
| ६ गुंतवणूक निधी | ८६ | ९० | १०४ | ११२ | १३२ |
| ७ इतर निधी | ६२ | ७० | ८२ | ९४ | १२१ |
| | १४७९ | १६३१ | १७८८ | २००७ | २३८२ |

### खेळते भांडवल

रु. १२,४०३ इतक्या खेळत्या भांडवलावर ही बँक सुरू करण्यात आली. गेल्या ५० वर्षांच्या अस्तित्वात १९६८–६९ सालाच्या असेर रु. ८,०१,०१,०४२ इतके खेळते भांडवल निर्माण करण्यात ती समर्थ झाली आहे. थोड्या अवधीत मिळविलेले हे यश खरोखरच आश्चर्यजनक आहे. इतक्या सर्व वर्षांत कर्जावर अवलंबून राहण्यापेक्षा स्वतःच्या फंडावर व गोळा केलेल्या ठेवींवर काम चालविण्याचा बँकेने सतत प्रयत्न केला आहे. पुढील आकडे वरील विधान सिद्ध करू शकतात.

### दिलेले कर्ज

संलग्न झालेल्या संघांना पैसा पुरवून त्यांच्या मार्फत त्यांच्या सभासदांना शेतीची कामे चालविण्यास व आपल्या कर्जातून मुक्तता करण्यास पैसा पुरविला जावा या मुख्य उद्देशाने बँकेची स्थापना झाली.

बँकेच्या आरंभापासून १९५१ पर्यंत ग्रामीण शेतकी सहकारी संघांना दिलेला पैसा उत्पादनाभिमुख नव्हता. पीके काढण्याकरिता ज्या शास्त्रशुद्ध पायावर कर्ज मंजूर करावे लागते त्याचा अभाव होता आणि जामिनकीचा प्रश्नही प्रमुख होता. जे चांगली जामिनकी देऊ शकत त्यांनाच इच्छिलेले कर्ज मिळत असे.

वरील धोरणामुळे व शेतकऱ्यांना धक्का दिलेल्या मंदीकाळामुळे त्यांच्या कर्जाचा बोजा वाढत गेला. त्यांच्या परत फेडीची ऐपत त्यांच्या कर्जाशी जमविण्यासाठी १९४७ साली सरकारने "अॅग्रिकल्चरल डेटर्स रिलिफ अॅक्ट" पास केले. याच्यानुसार जे शेतकरी आपले कर्ज कमी करून घेण्याकरिता "डेट कन्सिलिएशन" बोर्डाकडे जात असत त्यांना पैसा द्यावा लागे. संघ त्यांना प्रवेश देऊन सभासद करून घेत व त्यांच्या मालकीची जमीन आहे किंवा नाही हे न पाहता पीक काढण्यासाठी त्यांना पैसा देत असत. जर का या संघांनी सभासद करून घेण्यासाठी ऋणकोंना प्रवेश दिला नाही तर या बँकेला सामान्य सभासद म्हणून प्रवेश द्यावा लागे व त्यांना पाहिजे असलेला पैसा पुरवावा लागे. या बाबतीत या बँकेने आपली कामगिरी अत्यंत उत्कृष्टपणे बजावली आहे. कर्जाऊ दिलेल्या सर्व रकमा पूर्णपणे वसूल करण्यात आल्या आहेत. सरकारकडे जाऊन सरकारी हमीनुसार उपाययोजना करा अशी विनंती करण्याचा प्रसंग कधी आलाच नाही.

### उत्पादनाभिमुख कर्जधोरण

रूरल केडिट सर्व्हे रिपोर्टच्या शिफारशी सरकारने स्वीकारल्या

## खेळत्या भांडवलाची वर्गवारी

(आकडे हजारामध्ये)

| वर्ष | शेअर भांडवल रिझर्व फंड एकंदरीत स्वतःचे फंड | ठेवी | कर्ज | खेळते भांडवल | खेळत्या भांडवलाशी स्वतःच्या फंडाची टक्केवारी | खेळत्या भांडवलाशी ठेवींची टक्केवारी | खेळत्या भांडवलाशी कर्जाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १९६३–६४ | ३९५५ | २३०५५ | १२८६७ | ३९८७७ | ९.९ | ५७.९ | ३२.२ |
| १९६४–६५ | ४५८३ | २६२०२ | २०६५० | ५१४३५ | ८.९ | ५०.८ | ४०.३ |
| १९६५–६६ | ५०६१ | २९४६२ | २६३०० | ५७८२३ | ८.७ | ४५.८ | ४५.५ |
| १९६६–६७ | ६०४६ | ३३१२३ | २०३९६ | ५९५६५ | १०.१ | ५५.७ | ३४.२ |
| १९६७–६८ | ७८४९ | ४१२८६ | १८८२९ | ६७९६४ | ११.५ | ६०.८ | २७.७ |
| १९६८–६९ | १०१११ | ४८९२५ | २१०६५ | ८०१०१ | १२.७ | ६१.० | २६.३ |

आणि त्या कृतीत आणण्याचा आदेश संघांना देण्यात आला. या अहवालाचा परिणाम म्हणून बँकेची कर्ज देण्याची आजची पद्धत उत्पादनाभिमुख अशी आहे. पीकवार व एकरवार अल्प मुदतीची कर्जे देण्यात येतात.

शेतकी उपयुक्ततेवर अधिक भर दिला जातो. फील्ड वर्कर्स कॉन्फरन्समध्ये अल्प मुदतीच्या कर्जांना पैसा पुरविण्याच्या धोरणात दरवर्षी सुधारणा केली जाते. अशा रीतीने हा पैसा पुरविण्यासाठी वास्तववादी दृष्टीकोनाचा उपयोग केला जातो. याचा परिणाम म्हणून संघांना पुरविण्यात येणाऱ्या पैशाचे प्रमाण अतिशय वेगाने वाढत आहे.

पिके काढण्यासाठी देण्यात येणाऱ्या पैशाला पुरवणी म्हणून ऑईल इंजिन्स, पंप–सेटस् आणि इलेक्ट्रिक मोटर्स खरेदी करण्यासाठी बँक माध्यमिक मुदतीचे कर्जही देते. याचा हेतू असा की, जास्त जमीन पाण्याखाली आणून उत्पादन दुप्पटीने वाढावे. शेतकी संघाच्या पुष्कळशा सभासदांना ९२१ ऑईल इंजिन्स व ९९९ इलेक्ट्रिक मोटर्स खरेदी करण्यासाठी बँकेने रु. ४८ लाख मंजूर केले आहेत. यामुळे शेतकऱ्यांना आपली सुमारे ९,००० एकर कोरडी जमीन पाण्याखाली आणण्यात मदत झाली आहे. शिवाय शेतकऱ्यांचे उत्पादन सामर्थ्य वाढविण्यासाठी जमीन सुधारणा, कुकुट पालन व इतर कारणांसाठी माध्यमिक मुदतीची कर्जे देण्यात येतात.

परिश्रमपूर्वक शेती योजना (Intensive Agl. Area Programme) व जास्तीत जास्त उत्पन्न देणाऱ्या विविध योजना (High Yielding Varieties Programme) या शेतकी कार्यक्रमांना शेतकी व ब्लॉक डेव्हलपमेंट खात्याच्या मदतीने पैसा पुरविण्याचे बँकेने अलिकडे पत्करले आहे.

शेतीला पैसा पुरविण्याखेरीज मार्केटींग व धान्य खरेदीच्या व्यवहारासाठी ही बँक मार्केटींग सोसायट्यांना पैसा पुरविते. अर्बन बँका व पगार धारकांच्या संघांना त्यांच्या पोट नियमानुसार कायदेशीर व्यवहार करण्यासाठीही पैसा देते.

मध्यवर्ती सरकारच्या धोरणानुसार ग्राहक चळवळीच्या बाबतीत वाटप व्यवहार करणे शक्य व्हावे म्हणून मूळ ग्राहक स्टोअर्स व संघांना ही बँक कॅश क्रेडिट मंजूर करते. जिल्हा होलसेल स्टोअर्सनाही ही बँक पैसा पुरविते.

या जिल्ह्यात दोन साखर कारखाने आहेत. दि हिरण्यकेशी को–ऑप. शुगर फॅक्टरी, संकेश्वर ही पूर्वीच उत्पादन करीत आहे. या कारखान्याला लागणारी अल्प मुदतीची व दीर्घ मुदतीची दोन्ही कर्जे म्हैसूर स्टेट को–ऑप. अपेक्स बँक लि. बेंगळूर यांच्याकडून बँकेमार्फत पैसा देण्याची सोय होते. याखेरीज दि मलप्रभा को–ऑप. शुगर फॅक्टरी, एम्. के. हुबळी या नावाचा दुसरा एक कारखाना मुगुटखान हुबळी येथे आहे. या कारखान्याचे शेअर्स विकत घेण्यास शक्य व्हावे म्हणून संघाच्या ऊस पिकविणाऱ्या सभासदांना माध्यमिक मुदतीची कर्जे बँकेने मंजूर केली आहेत.

## नजरेसमोरील उद्दिष्टे

भारतासारख्या विकसनशील देशात प्रगतीची सर्व कामगिरी फक्त सरकारने हाती घेऊन पुरेसे होत नाही. प्रत्येकाने आपापल्या परीने त्याला मदत करणे हे त्याचे कर्तव्य ठरते. पुढील दहा वर्षांच्या दोन योजनांच्या काळात पुढील विकास कामगिरी अंगीकारण्याचे या बँकेने ठरविले आहे आणि योगायोगाने या बँकेचा जो हीरक महोत्सव मोठ्या अभिमानाने साजरा करण्याचे योजिले आहे तोही त्याच काळात आहे.

पाणीपुरवठ्याची कामे अंगीकारून जास्त जमीन पाण्याखाली आणण्याचे बँकेने ठरविले आहे. खेडे गावात जवळच्या नाल्या ओढ्यात भरपूर पाणी वाहत असते. त्याचा उपयोग केला जात नाही. तेथील आजूबाजूच्या जमीन मालकांना एकत्र आणून पंपाने पाणी खेचण्याची योजना आखावयास लावून त्यांच्या जमीनींना पाणी पुरविण्याकरिता बँक त्यांना कर्ज देणार आहे. याकरिता जो पैसा लागणार आहे तो तेथील संबंधीत ग्राम सेवा सहकारी संघामार्फत देण्यात येणार आहे. अशा प्रमाणे दरवर्षी सुमारे २,००० एकर कोरडी जमीन पाण्याखाली आणण्याचे बँकेने ठरविले आहे. दहा वर्षांच्या शेवटी २०,००० एकर गाठण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

जेव्हा २०,००० एकर कोरड्या जमिनीचे रूपांतर ओल्या जमिनीत होईल तेव्हा उत्पादनही आपोआप दुप्पट होईल. जर काही सर्व जमीन अन्नधान्य उत्पादनासाठी वापरली तर जास्तीचे पीक २०,००० टन होईल.

उत्पादन वाढीला अत्यंत सहाय्यभूत ठरणाऱ्या जास्त उत्पन्न देणाऱ्या पिकांच्या बिया जास्त लोकप्रिय करण्याचे बँकेने विचारात घेतले आहे. या गोष्टीने परत २०,००० टन जादा उत्पन्न वाढविण्याचे तिने योजिले आहे.

वरील गोष्टीखेरीज जिल्ह्यातील संपत्ती वाढविण्यास मदत करणारे कुकुट पालन व डेअरीचे व्यवसाय अधिक लोकप्रिय करण्याचे बँकेने योजिले आहे.

वरील सर्व विकास योजनेसाठी बँकेला भरपूर पैशाची आवश्यकता आहे. यासाठी बँक अपेक्स बँक अगर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियावर अवलंबून राहू शकणार नाही. स्वतःचे भांडवल वाढविण्याची जरूरी आहे, हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ठेवीच्या आकर्षक योजना आखून खेड्यांतील बचतीचा उपयोग करण्याचा बँकेचा विचार आहे. या कामासाठी कमीत कमी ३ कोटी रुपये गोळा करण्याचे बँकेने योजिले आहे.

हा विचार ठेवून बँकेने ८ टक्के व्याजाच्या दराने हीरक महोत्सव मुदत ठेवीची योजना सुरू केली आहे. व त्याप्रमाणे ३० जून १९६९ अखेर रु. २५,९१,५०० इतके वसूल केले आहेत.

येत्या भविष्य काळात उपयुक्त अशा इतर योजना दिग्दर्शक मंडळ आखतील.

## आपल्या बॉसचे स्वरूप ओळखा !

कमीत कमी वेळामध्ये जास्तीत जास्त निर्मिती करणे हे बॉसचे ध्येय असते. त्याला पोषक होणार नाही अशी कोणतीही गोष्ट ऐकून घेण्यास तो तयार नसतो. तुम्ही कामावर आला, म्हणजे यंत्राप्रमाणे ठराविक वेळ ठराविक काम कार्यक्षमतेने करीत राहिले पाहिजे. दहापैकी कोणतेही सहा प्रश्न सोडवून येथे फर्स्ट क्लास मिळू शकत नाही; शंभर टक्के बिनचूक काम सतत करावे लागते.

बॉस जास्त अनुभवी असतो आणि त्याला अधिकारही असतो. सत्तेपुढे शहाणपण दाखविणे हानिकारक ठरते. त्याच्याशी वाद घालणे घातुक असते. त्याच्या मोठेपणाच्या भावनेला धक्का न लावता, चातुर्याने सर्व काही करावे लागते—हुशार पत्नी भर्त्या पतीशी वागते, त्याप्रमाणे.

आपले म्हणणे मुद्देसूद, संगतवार सांगता आणि लिहिता आले पाहिजे. येथे वेळेला फार महत्त्व आहे. पाल्हाळ त्याज्य आहे.

पाठ्यपुस्तकांच्या बाहेरचे व्यावहारिक ज्ञान तरुणांना असणे आवश्यक आहे. हे ज्ञान नेहमीचे शिक्षण चालू असतानाच मिळवीत राहिले पाहिजे. स्वतः विमानातून प्रवास केला नाही तरी त्याच्या येण्याजाण्याच्या वेळा माहीत असल्या तर त्यामुळे बॉसवर इंप्रेशन पाडण्यास संधी आली तर ती साधता येते.

"जे आपण शिकलो त्याचा नोकरीच्या जागी काहीच उपयोग होत नाही, त्यामुळे नोकरीत मन रमत नाही" अशी पुष्कळांची तक्रार असते. सर्वच क्षेत्रात बहुतेकांना असाच अनुभव येतो; तेव्हा नोकरीत मन घालून कामाशी मुद्दाम तन्मय व्हावे लागते.

फाजील स्थैर्यप्रियता उपयोगाची नाही. परप्रांतीय लोक येथे येऊन स्थायिक होतात आणि हक्काने व पात्रतेने येथील नोकऱ्या मिळवितात. उलट, परप्रांतात हयात घालविलेले महाराष्ट्रीय तेथेच स्थायिक न होता परत महाराष्ट्रात येतात. याचे परिणाम लक्षात बाळगून तरुणांनी स्वतःच्या मनोवृत्तीत सुधारणा घडवून आणली पाहिजे.

आपण आपल्या बॉसपेक्षा शहाणे आहो; तो आपल्या आधी आला किंवा त्याचा वशिला आहे म्हणून तो आपला बॉस झाला, हा अहंगड तरुणांच्या उत्कर्षाच्या आड येतो. बॉसचे निर्णायक उच्च स्थान स्वीकारलेच पाहिजे. केवळ वशिल्याच्या जोरावर माणसे नेमली गेली, तरी ती टिकू शकत नाहीत, त्यांचे पितळ बाहेर पडते, अशीच औद्योगिक क्षेत्रातील परिस्थिती असते.

## आपली उपयुक्तता वाढवा ! हक्काने मोबदला घ्या

ज्याच्या अंगात गुण आहेत, ज्याची श्रमाची तयारी आहे, अशाला औद्योगिक क्षेत्रात कुणीही अडवू शकत नाही. त्याचे चीज झाल्याविना राहात नाही. फार तर त्याला त्यासाठी कंपनी बदलावी लागेल.

येथे प्रत्येक गोष्ट बाजारभावानेच ठरते. एखाद्या परीक्षेतील यशाच्या पुण्याईवर जन्मभर आरामात काढण्याचे औद्योगिक क्षेत्र हे स्थान नव्हे. आपली उपयुक्तता वाढवा, बाजारभाव वाढवा आणि त्याप्रमाणे मोबदला हक्काने मागून घ्या.

महाराष्ट्रीय माणसाला इतर माणसांत मिसळण्याची सवयच नसते. त्यामुळे तो बाजूला पडतो. इतरांच्यातही आपल्याप्रमाणेच काही गुण आहेत, त्यांच्या पद्धतींनाही काही अर्थ आहे हे ओळखूनच प्रत्येकाने सर्व प्रकारच्या लोकांशी समरस व्हायला शिकले पाहिजे. आता कोणत्याही नोकरीच्या ठिकाणी एकाच धर्माचे, जातीचे, प्रांताचे, भाषेचे, परंपरेचे लोक आढळत नाहीत; सर्वांची सरमिसळ झालेली असते.

आपल्या बोलण्यात—वागण्यात मार्दव आणण्यास खूपच वाव आहे. 'सर' हा शब्द आपण क्वचितच वापरतो. बॉस हा जरी शिष्टाचार पाळणारा नसला, तरी त्याच्या हाताखालील नोकरांकडून तो शिष्टाचारांची अपेक्षा करतो.

बॉस हा कंपनीच्या यंत्रणेचा एक घटक असला, तरी तो माणूस असतो आणि त्याला मन असते; भावना असतात. त्याच्या काही आवडीनिवडी असतात. त्या लक्षात आणून त्याचा आदर ठेवणे त्याच्या हाताखालील लोकांचे कर्तव्यच ठरते. बॉस सिगरेट ओढीत नसेल, तर त्याच्या देखत सिगरेट न ओढणे किंवा पेटविलेली सिगरेट बाजूस करणे इष्ट होय. बॉसला सकाळी प्रारंभी 'गुड मॉर्निंग' करणे, तो येतेवेळी उभे राहणे किंवा उठल्यासारखे दाखविणे म्हणजे काही त्याची अवास्तव खुषामत करणे नव्हे.

## तुम्ही असे आहात ?

तरुणांची नोकरीसाठी निवड करताना कंपनी कोणत्या गोष्टींना महत्त्व देते ?

(१) कोणत्याही एका विषयात तो विशेष तज्ज्ञ असण्याची आवश्यकता नाही. त्याचे सर्वांगीण शिक्षण झालेले असणे अधिक महत्त्वाचे असते. (२) शारीरिक आणि मानसिक आरोग्य पाहिले जाते. शारीरिक पंगुत्व असले तरी एक वेळा चालते, पण मन खंबीर आणि उत्साही हवे. (३) विनोदबुद्धी असणारा तरुण टक्केटोणपे खाऊ शकतो. (४) सांगकाम्यापेक्षा स्वतःची बुद्धी वापरू शकणारा अधिक पसंत केला जातो. (५) ज्याची कल्पनाशक्ती विकसित आहे, त्याला कंपनीत अधिक वाव मिळतो. (६) निर्णय घेता येण्याची कुवत हवी; परिस्थितीची केवळ छाननी करता येणे पुरेसे नसते. (७) स्वतःला शिस्त लावून घेऊ शकणारा तरुणच निवडला आणि कायम केला जातो. (८) चारचौघांशी संघर्ष येऊ न देता मिळूनमिसळून वागता आले पाहिजे. (९) जो आपली सर्व शक्ती कंपनीसाठी वेचण्यास तयार असतो, तोच बॉसला प्रिय होतो आणि कंपनीस जवळचा वाटतो. (१०) आत्मविश्वास असणाराच हे सर्व करू शकतो. गबाळ्याचे हे क्षेत्रच नव्हे.

### भारताला अधिक परदेशी भांडवल मिळविता येईल

कॉन्फिडरेशन ऑफ ब्रिटिश इंडस्ट्री ह्या संघटनेचे ज्येष्ठ सल्लागार सर नॉर्मन किपिंग ह्यांनी असा अभिप्राय व्यक्त केला आहे की परदेशीय कारखानदारांचे सहकार्य घेण्याच्या बाबतीत भारताने आपले धोरण सध्यापेक्षा थोडे मऊ ठेवल्यास भारताला परदेशातून अधिक भांडवल आकृष्ट करता येईल. भारत आणि ब्रिटन ह्यांमधील तंत्रज्ञांत चालू असलेल्या बोलण्यात ब्रिटनमधील खाजगी मालकीच्या भांडवलदारांतर्फे भाग घेण्यासाठी ते भारतात आले होते. ते म्हणाले की, भारतात परदेशी खाजगी मालकीचे भांडवल गुंतविण्यात बरीच वाढ साधता येणे शक्य आहे. भारतामधील आर्थिक मंदीची छाया आता निवळली आहे. शिवाय हरित क्रांतीही यशाची वाट चालू लागली आहे. त्यामुळे हिंदमधील शेतकऱ्यांच्या हातात पूर्वीच्या मानाने अधिक पैसा येत आहे. त्याचा उपयोग करून औद्योगिक आणि शेतीविषयक सुधारणा घडवून आणणे शक्य आहे. औद्योगिक विकास साधण्याच्या कामी, भारत सरकारने सहकार्य करण्यास तयार असलेला परदेशी कारखानदार आणि भारतामधील उद्योगपती ह्यांना परस्परांशी वाटाघाटी करण्याची मोकळीक ठेवावी. सरकारच्या सर्वसाधारण धोरणाशी विसंगत काही करण्यात येत असल्यास त्यावर मात्र सरकारने नजर ठेवावी. परदेशांतील तंत्रज्ञानाची माहिती करून घेण्यासाठी द्यावी लागणारी वाजवी किंमत देण्यास भारताने खळखळ करू नये. ह्या ज्ञानाच्या मोबदल्यावर कमाल मर्यादा घालणे योग्य होणार नाही. भारतात भांडवल गुंतविण्याच्या ज्या संधी उपलब्ध आहेत त्यांची माहिती अधिक चांगल्या पद्धतीने परदेशांत मिळण्याची व्यवस्था झाली पाहिजे.

### राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचा अंदाज

हिंदच्या अर्थव्यवस्थेसंबंधी नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रीसर्च ह्या संघटनेने एक पाहणी केली आहे. ह्या पाहणीत असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे की १९७०–७१ सालात राष्ट्रीय उत्पन्नात ६.५ टक्क्यांनी वाढ होईल. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमात गुंतवावयाच्या भांडवलासंबंधी असा अभिप्राय व्यक्त करण्यात आला आहे की २५,००० कोटी रुपयांची गुंतवणूक योग्य आणि व्यवहार्य होईल. अर्थव्यवस्थेसंबंधीच्या ह्या पाहणीत अनेक बाबींचा विचार करण्यात आला आहे. त्यांतील काही अशा: शेती व उद्योगधंदे ह्यांमधील उत्पादनात दिसून येणारी दिशा, किमती, पैशाचा पुरवठा, निर्यात आणि आयात ह्या बाबींचा विचार करून चौथ्या कार्यक्रमाच्या प्रत्येक आगामी वर्षात, उत्पादनात होणाऱ्या प्रत्यक्ष वाढीच्या अनुषंगाने अधिकाधिक गुंतवणूक करण्यात यावी असे सुचविण्यात आले आहे. १९७०–७१ साली अमलात आणावयाच्या २,५०० कोटी रुपयांच्या कार्यक्रमात ३०० कोटींचा तुटीचा अर्थसंकल्प जरूर आहे असे मत व्यक्त करण्यात आले आहे. चौथी पंचवार्षिक योजना पार पाडावयाची तर १,००० कोटी रुपयांचा तुटीचा अर्थसंकल्प करावा लागेल. कार्यक्रमात सुचविण्यात आलेल्या ८५० कोटी रुपयांचा तुटीचा संकल्प अपुरा पडेल असे मंडळाचे मत आहे. हवापाणी अनुकूल लाभले तर पुढील वर्षी अन्नधान्याचे उत्पादन १०.५ कोटी टनापर्यंत जाईल, उद्योगधंद्यांची वाढीची सरसकट गती ८ ते ९ टक्के राहील आणि निर्यातीच्या गतीत ५ टक्क्यांनी वाढ होईल असा अंदाज करण्यात आला आहे.

### मोठ्या शहरांतील भिकाऱ्यांची वाढती संख्या

बहुतेक राज्यांतून भीक मागण्यास बंदी करणारे कायदे करण्यात आलेले आहेत आणि तरीही मोठ्या शहरांतील भिकाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. १९५१ ते १९६१ ह्या दहा वर्षांच्या अवधीत भिकाऱ्यांची संख्या ५ लाखांवरून १० लाखांपर्यंत वाढलेली आहे. १९७१ पर्यंत त्यांची संख्या २० लाखांवर जाईल असा अंदाज आहे. कलकत्ता शहराच्या पोलिस खात्याने अलीकडे भिकाऱ्यांची पाहणी केली. तीवरून असे दिसून आले की कलकत्ता शहरात ३० हजारांवर भिकारी आहेत. शिरगणतीत जमविण्यात आलेल्या माहितीप्रमाणे आंध्र राज्यात सर्वांत अधिक म्हणजे १.२९ लाख भिकारी आहेत. त्याच्या खालोखाल प. बंगालमध्ये १.६ लाख भिकारी आहेत. धर्माच्या नावाखाली भीक मागणारे सोडले तरी भिक्षेकऱ्याचा धंदा परंपरेने चालविणारे अनेक गट देशात आहेत. भिकाऱ्यांचा प्रश्न आता आंतरराज्यीय प्रश्न झालेला आहे. कारण, प्रवासाच्या सोयी वाढल्यामुळे भिकाऱ्यांची भ्रमंतीही वाढलेली आहे. भीक मागणाऱ्या लोकांची संख्या वाढण्याची अनेक कारणे असली तरी शिरगणतीत करण्यात आलेल्या अभ्यासाप्रमाणे बहुतेक भिकारी दारिद्र्यामुळेच भीक मागण्यास प्रवृत्त होतात. दारिद्र्याबरोबरच आर्थिक अनिश्चितता आणि योगक्षेमाची अपुरी सोय हीही कारणे प्रभावी ठरतात. त्याशिवाय सामाजिक विस्कळीतपणा, शारीरिक आणि मानसिक दौर्बल्य, अपंगत्व, वार्धक्य, ही कारणे आहेत. बहुतेक भिकारी शारीरिक दृष्ट्या धडेकट्टे असतात. १० टक्के भिकारी १५ वर्ष वयाखालील आणि २५ टक्के ६० वर्षांवरील आहेत.

### आसाममध्ये कागदाचा कारखाना

आसाम राज्यातील गोलपाडा जिल्ह्यात कागद आणि तो तयार करण्यासाठी लागणारा लाकडाचा लगदा तयार करण्याचा एक कारखाना काढण्यात येणार आहे. तो सरकारी मालकीचा असेल. ह्या कारखाना प्रथम खाजगी मालकीचा होणार होता. ह्या कंपनीला इंडिअन फिनॅन्शिअल कॉर्पोरेशनने काही कर्जही दिलेले होते. परंतु नंतर कंपनी व कॉर्पोरेशन ह्यांच्यात तंटा उत्पन्न होऊन कॉर्पोरेशनने कर्ज परत मागितले होते. हे प्रकरण पाटणा हायकोर्टापर्यंत गेले होते. हायकोर्टाने कॉर्पोरेशनचा दावा मान्य केला. संकल्पित कारखान्यात रोज १२० टन लगदा आणि ९० टन कागद तयार होईल.

### मध्यवर्ती आर्थिक नियोजनातील दोषांची चिकित्सा

आर्थिक जीवनाचे नियंत्रण करून ते योजनाबद्ध चौकटीत बसविण्याची कल्पना आता रूढ झाली आहे. मागासलेल्या देशांना आर्थिक सुस्थिती प्राप्त करून घ्यावयाची असेल तर नियोजनाशिवाय दुसरा मार्ग नाही हा विचार पक्का रुजला आहे. भारताने ही कल्पना व्यवहारात उतरवून तीन पंचवार्षिक योजना पार पाडल्या. त्यामुळे काय पदरात पडले ह्याविषयी उलटसुलट चर्चा अजूनही चालूच आहे. भारताने आपल्या आर्थिक नियोजनात संमिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला होता व आहे. म्हणजे ह्या नियोजनात सरकारी मालकीच्या विभागाबरोबरच खाजगी मालकीच्या विभागालाही वाव ठेवण्यात आला होता व आहे. तथापि, नियोजनाचा आराखडा मुख्यतः सरकारी प्रेरणेनेच आखण्यात येत असे. म्हणजेच भारतामधील नियोजन मध्यवर्ती स्वरूपाचे झाले आहे. अशा प्रकारच्या नियोजनातील दोष दाखविण्याची संधी ब्रिटनमधील एका प्राध्यापकाला नुकतीच लाभली. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे प्राध्यापक पी. टी. बॉर ह्यांनी मुंबई येथे बोलताना मध्यवर्ती नियोजनाच्या कल्पनेची चांगली चिकित्सा केली आहे. मुंबईतील एक दिवंगत उद्योगपती श्री. मुरारजी वैद्य ह्यांच्या पहिल्या स्मृति-दिनी ते बोलत होते. ते म्हणाले की, सर्वंकष स्वरूपाच्या मध्यवर्ती नियोजनामुळे आर्थिक प्रगती साधण्यापेक्षा ती रोखली जाण्याची शक्यताच अधिक आहे. अशा प्रकारच्या नियोजनामुळे प्रस्थापित राज्यसत्तेला वशिलेबाजी आणि भ्रष्टाचार ह्यांचा आचार करण्याचे एक साधन मात्र उपलब्ध होईल.

आर्थिक नियोजन लोकांचे जीवनमान सुधारण्याचे एक साधन आहे असे सांगण्यात येते; परंतु मध्यवर्ती नियोजनात तरी अशा हेतूचा अभावच असतो. आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी करावा लागणारा गुंतवणुकीचा भांडवली खर्च अशा नियोजनाशिवाय करता येणार नाही असा दावा करण्यात येतो. पण हा दावा फोल आहे. कारण, मध्यवर्ती नियोजनाने असलेल्या साधनसंपत्तीत नवीन भर पडत नाही. होते ते इतकेच की एका आर्थिक आघाडीवरून दुसऱ्या आर्थिक आघाडीवर साधनसंपत्ती हलविली जाते. आर्थिक प्रगती साधण्याचा एकच मार्ग आहे, आणि तो म्हणजे बचतीचा व भांडवल गुंतवणुकीचा वेग वाढवीत जाणे. नियोजनामुळे बचतीच्या प्रमाणात वाढ होते असे मानता येत नाही. उलट, पुढाकार घेऊन नवीन उद्योगधंदे काढणाऱ्यांच्या कृतिशीलतेवर नियंत्रणे घातल्याने बचतीचा दर खालीच येतो. द्रव्यविषयक उपाययोजना करून बचत वाढविण्याचे मार्ग आहेत. पुष्कळशा मागासलेल्या देशांत आर्थिक सोयीसवलती मुळीच नसतात; अगर फारच अल्प प्रमाणात उपलब्ध असतात. त्यामुळे ते आर्थिकदृष्ट्या मागासलेले राहतात. आर्थिक प्रगती साधण्यासाठी भांडवल हे गतिशील असले पाहिजे. त्याचप्रमाणे माणसाच्या कौशल्याची आणि प्रयोगशीलतेचीही त्यासाठी जरूर आहे. ह्या गोष्टी सरकारच्या नियंत्रणाखाली रुजण्याची आणि वाढण्याची शक्यता नाही. म्हणून सरकारने देशाचे परराष्ट्रीय व्यवहार, शिक्षण आणि शेतीचा विकास साधण्यासाठी जरूर असणाऱ्या सोयीसवलती ह्या बाबींवर आपले लक्ष केंद्रित करावे. अशा धोरणामुळे देशाची भौतिक भरभराट साधण्यास चांगली मदत होऊ शकेल.

---

### मोटारवाल्यांचा कुशल यांत्रिक मदतनीस

मोटार चालविणे सुखद असले तरी त्याबरोबर काही जबाबदाऱ्याही अंगावर पडतात. त्या योग्य रीतीने पार पाडण्यास मोटार चालविणाराची मानसिक व शारीरिक सुस्थितीच मुख्यतः उपयोगी पडते आणि कसाही हुषार माणूस असला तरी अपवादात्मक परिस्थितीत अपघात होण्याचा संभव हा उरतोच. अशा परिस्थितीत मोटारीचे नियमन करणारा एक यांत्रिक मदतनीस युगोस्लाव्हिआतील एका संशोधकाने बनविला आहे. हा मदतनीस गाडीत बसविला म्हणजे टक्कर होण्याचा संभव असला तर गाडीचे ब्रेक्स् आपोआप लागतात आणि उघडझाप करणारे दिवे आपोआप लागतात. गाडी चोरण्याचा प्रयत्न झाल्यास गाडी सुरू होताच ती एकदम बंद होते आणि धोक्याचा भोंगा मोठ्याने वाजू लागतो. यांत्रिक मदतनिसाचे पेटंटचे अधिकार एका जर्मन कंपनीने विकत घेतले आहेत.

---

### अयूबखानांची चोरट्या व्यापारात भागीदारी

लाहोर येथील 'मशीक' ह्या दैनिकात सय्यद नूर अहमद नावाच्या एका सेवानिवृत्त पाकिस्तानी अधिकाऱ्याने एक लेख लिहिला आहे. सदर लेखात असा आरोप करण्यात आला आहे की पदच्युत अध्यक्ष अयूबखान सत्ताभ्रष्ट झाले त्या वेळी ते चोरट्या व्यापारात भागीदारी करीत होते. लेखात पुढे असेही म्हटले आहे की, पाकिस्तानच्या गव्हर्नर जनरलपासून कराचीच्या कमिशनरापर्यंत सर्वांचेच हात ह्या व्यापारात गुंतलेले होते. कासीम ह्या नावाने प्रसिद्ध असलेल्या चोरट्या व्यापाराच्या बादशहाकडून सर्वांनाच कमिशनचा खुराक मिळत असे. नूर अहमद हे पाकिस्तानचे माजी सार्वजनिक संबंध खात्याचे प्रमुख होते.

---

**नवी मालवाहू बोट** — शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिआसाठी युगोस्लाव्हिआत बांधण्यात आलेली "वेलारी" नावाची मालवाहू बोट ताब्यात मिळाली आहे. ह्या बोटीचे वजन ८६,९६० टन असून तिची लांबी २५६ मीटर आहे. रुंदी ३२ मीटर आहे. आणखीही अशाच दोन बोटी भारतासाठी बांधण्यात येत आहेत. तिची जास्तीत जास्त गती ताशी १६ नॉटस आहे.

---

### औद्योगिक प्रगतीची आशा वेतावाताची

इंडिअन मशीन टूल्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ह्या संघटनेची २३ वी सर्वसाधारण सभा मुंबई येथे भरली होती. सभेचे उद्‌घाटन करताना रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर श्री. एच्. व्ही. आर. अय्यंगार ह्यांनी देशातील औद्योगिक प्रगतीबद्दल निराशा व्यक्त केली. ते म्हणाले की निदान नजीकच्या भविष्यकालात तरी फार मोठी औद्योगिक प्रगती होईल असे वाटत नाही. तरीसुद्धा आणखी १०-१२ वर्षांच्या अवधीत ह्या परिस्थितीत उत्साह वाटण्यासारखी सुधारणा होणे शक्य आहे. पण, तसे होण्यासाठी देशाच्या औद्योगिक धोरणात सुसंगतपणा असला पाहिजे. त्याचप्रमाणे कारभार कार्यक्षम असला पाहिजे आणि खाजगी मालकीच्या व सार्वजनिक मालकीच्या विभागात सहकार्य नांदले पाहिजे. सद्यः परिस्थितीचा वस्तुनिष्ठ विचार केला तर असे दिसून येते की औद्योगिक विकासावर मुख्यतः सरकारचे नियंत्रण आहे. म्हणूनच राज्यकारभाराची व्यवस्थित घडी महत्त्वाची झाली आहे. आज पश्चिम बंगाल, केरळ, उत्तरप्रदेश, बिहार, इत्यादी राज्यांतील राजकीय परिस्थिती अस्थिर आहे. अशा स्थितीत औद्योगिक वृद्धी होणे कसे शक्य आहे? सरकारची औद्योगिक परवाने देण्याची पद्धत अनिश्चित आहे. सरकारचे सर्व लक्ष आर्थिक सत्तेच्या तथाकथित केंद्रीकरणाकडे लागलेले आहे. मोठ्या कारखानदारीकडे सरकार एकंदरीने शत्रुत्वाच्या भावनेने पाहात आहे. औद्योगिक विकासाची कामे पार पाडण्याची कुवत आणि साधनसंपत्ती ज्यांच्याजवळ आहे ते लोक ह्यामुळे नाउमेद झालेले आहेत. काही करून दाखविण्याची त्यांची वृत्ती क्षीण होत आहे. उद्योगपतींना स्वतःलाच आपण कोठे आहोत ते कळेनासे झाले आहे.

काही करू म्हटल्यास सरकारकडून उत्तेजन मिळण्याची फारशी आशा त्यांना वाटत नाही. राजकीय परिस्थितीबरोबरच आणखी दोन प्रश्नांचा विचार अगत्याचा झाला आहे. परदेशांशी करावयाचे तांत्रिक सहकार्य आणि भारताच्या औद्योगिक विकासाची सध्याची अवस्था हे ते दोन प्रश्न आहेत. यांत्रिक हत्यारांच्या उद्योगधंद्याच्या गेल्या वीस वर्षातील कालाचा अभ्यास केला तर असे दिसते की ह्या धंद्यातील भारताची प्रगती मुख्यतः परदेशातील तंत्रज्ञान उसने घेऊन झालेली आहे. सध्या देशात स्वतःचे तंत्रज्ञान पहिल्यापासून निर्माण करण्याचे प्रयत्न होत आहेत. पण असे करणे योग्य होणार नाही. त्यापेक्षा जगातील तंत्रज्ञानाचा परिचय करून घेऊन त्याचा वापर करणे अधिक हिताचे ठरणार आहे. भारताला निर्यात वाढविण्याची गरज तातडीने भासत आहे. अशा वेळी तर प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करणे अतिशय निकडीचे आहे. मग त्यासाठी किंमत मोजावी लागली तरी हरकत नाही.





### रशियात चुंबन टाळण्याचा सल्ला

चित्रपटात चुंबनाचे दृश्य दाखवावे की नाही ह्याबद्दल भारतात कढाक्याचा वाद माजला आहे. प्रेमिकांच्या जीवनात चुंबन विधीला महत्त्वाचे स्थान असेलही. पण मदनाच्या भात्यातील ह्या अमोघ बाणामुळे रोग फैलावू लागला तर मात्र अनवस्था प्रसंग ओढवतो. गेल्या काही महिन्यात रशियातील मोठमोठ्या शहरातून शीतज्वराची साथ उफाळली होती. शीतज्वर हा संसर्गजन्य असल्यामुळे रशियन नागरिकांनी रोगाची साथ असेपर्यंत चुंबन घेण्याचे टाळावे असा सल्ला देण्यात आला होता. ह्या चुंबनात प्रेमिकांच्या चुंबनाप्रमाणेच इतर चुंबनांचाही समावेश होता. कारण शीतज्वराचे जंतू आपले काम चोख बजावतात. चुंबनाच्या भावनिक हेतूंचे त्याना सोयरसुतक असण्याचे संभवत नाही.

---

### वसईच्या खाडीवरील नवा पूल

मुंबई-अहमदाबाद रस्त्यावरील वसईच्या खाडीवरील नवा पूल पुरा झाला असून त्याचे उद्घाटन ता. १२ रोजी करण्यात आले. ठाणे जिल्ह्यातील हा एक महत्त्वाचा पूल आहे. दुसरा इतकाच महत्त्वाचा पूल ठाण्याच्या खाडीवर बांधण्यात येत असून तो पुरा होण्यास आणखी चारपाच महिने लागतील. वसईच्या खाडीवरील पुलाने ठाणे जिल्ह्याची चांगली सोय झाली आहे. पुलामुळे मुंबई-अहमदाबाद शहरामधील रस्त्याचे अंतर १९ किलोमीटरने कमी झाले आहे. वसईची खाडी व ठाण्याची खाडी ह्यांच्यामुळे मुंबई अलग पडलेली आहे. त्यामुळे रस्त्यातील वाहतुकीचा मुख्य भार मुंबई-ठाणे रस्त्यावर पडत असे. हा रस्ता मुंबई-पुणे, मुंबई-आग्रा आणि मुंबई-अहमदाबाद रस्त्यावरील प्रवासासाठी वापरला जात असे. आता त्यावरील गर्दी थोडी कमी होईल. वसईच्या पुलाची लांबी १८८२ फूट असून पुलाला ८ कमानी आहेत.

---

### पाक लष्करी अधिकाऱ्यांचा आरोप

पाकिस्तानमधील पीपल्स पार्टी ह्या पक्षाचे पुढारी मि. अकबर खान ह्यांनी पाकिस्तानी सरकारवर खळबळजनक आरोप केला आहे. मि. अकबरखान हे पाकिस्तानच्या लष्करात मेजर जनरलच्या हुद्यापर्यंत चढलेले होते. काश्मीरविषयी भारताशी असलेल्या भांडणात संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सभासदांचा पाठिंबा मिळविण्यासाठी पाकिस्तानने २५० कोटी रुपये खर्च केले; इतके ही करून ह्या प्रयत्नात यश आले नाही असा त्यांचा आरोप आहे. त्यांच्या मताने हीच रकम पाकिस्तानच्या तरुणांना लष्करी शिक्षण देण्यासाठी खर्च करण्यात आली असती तर ९५ लाख तरुणांना लष्करी शिक्षण देता आले असते. भारताच्या लष्करी सामर्थ्याचा पाकिस्तानी राज्यकर्त्यांना नेहमीच धाक वाटत आला आहे. त्यामुळे काश्मीरचा प्रश्न सुटत नाही असा त्यांचा अभिप्राय आहे.


## दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बँक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| | | |
|---|---|---|
| भाग-भांडवल व निधी | रु. | १४,६२,२०,००० |
| ठेवी | रु. | ७४,५७,३६,००० |
| खेळते भांडवल | रु. | १,४२,०९,१२,००० |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक

तारेचा पत्ता "मॉर्गेज"
मुख्य कार्यालय दूरध्वनी २६१४९७
उपकार्यालय क्र.१ दूरध्वनी ३६०३०६
उपकार्यालय क्र.२ दूरध्वनी २९०००६

## दि बाँबे स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.


जे. के. बिल्डिंग, १ ला माळा, डुगल रोड,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका ह्या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्जवाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६८ अखेर बँकेचे भागभांडवल ५ कोटी २८ लक्ष रु., गंगाजळी ३० लक्ष रु., ऋणविमोचन निधीची गुंतवणूक २१ कोटी रु. व येणे कर्ज ६७ कोटी रु. आहे.

वी. आ. कल्याणी
अध्यक्ष.

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

गो. प. भावे
कार्यकारी संचालक



पाणी... निसर्गाचें वरदान

वर्षाऋतूच्या आगमनाबरोबर सहस्रधारांनीं पाऊस येतो आणि सर्व भूमि जलमय होऊन जाते. पण ओहोळ, नाले, नद्या यांतून हे पाणी वाहून गेल्यावर किंवा ते जमिनींत जिरून गेल्यावर पिके, कारखाने, शहरे आणि ग्रामीणवस्ती यांच्या पाणी पुरवठ्याचा यक्षप्रश्न पुढे उभा राहातो. पाऊस फक्त वर्षातून एकदाच पडतो, पण

किर्लोस्कर® पंप

पाहिजे तेथें
पाहिजे तेव्हा
पाहिजे तेवढा
अखंड पाणीपुरवठा करतात

छोट्या बागायती, मोठ्या जलसिंचन योजना, कारखाने, ग्रामीण व शहरी पाणी पुरवठा अशा योजनांसाठीं लागणाऱ्या पंपाबाबत आमचे अेन्जिनिअर्स तुमच्या योजना अभ्यासून योग्य त्या पंपाची शिफारस करून तांत्रिक सल्ला विनामूल्य देतील. तुमच्या सविस्तर योजना कळवा.

प्रत्येक विशिष्ट गरजेसाठीं स्वतंत्र किर्लोस्कर पंप आणि प्रत्येक किर्लोस्कर पंप म्हणजे अनेक गरजांची पूर्ति !



किर्लोस्कर ब्रदर्स लि.

STUSA KM 3/67I



हे पत्र पुणे पेठ, शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)